विशेष **दिवाणी दावा क्र. १५१/२०२२**
**दिलीप आचार्य**
**वि.**
**निशीकांत पितळे वगैरे**
CNR No. **MHRG**020032492022

## निशाणी क्र. ५७ वरील आदेश

(पारित दिनांक १९/०८/२०२५)

वादीने कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी हा अर्ज दिला आहे. अर्जातील कथने अशी की, प्रतिवादी क्र. ५ व ६ ने वादीचे विरुध्द प्रतिदावा केला आहे. त्या प्रतिदाव्याला वेळेत कैफियत देणे आवश्यक होते परंतु प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी प्रतिदावा दिल्यानंतर अंतरिम अर्जाचे कामी सुनावणी तहकुब झाली व दरम्यान अनावधानाने प्रतिदाव्याला कैफियत देण्याचे राहुन गेले. प्रतिदाव्याला कैफियत देणे आवश्यक असुन ती अभिलेखावर घेतली नाही तर वादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी अशी वादीची विनंती आहे.

०२. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी नि.क्र. ६० कडे म्हणणे देवुन हरकत घेतली की, प्रतिदाव्यानंतर ९० दिवसांच्या आत वादीने कैफियत देणे आवश्यक होते परंतु कैफियत नाही असा दिनांक १८/१०/२०२३ रोजी आदेश झाल्यानंतरही २१ महिन्याने वादीने कैफियत दिली नाही. अर्जातील कारणे संयुक्तिक नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा, मंजुर करायचा झाल्यास रुपये १०,०००/– खर्चाची रक्कम वादीकडुन देण्यात यावी अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. कागदपत्रे पाहिली.

०४. प्रतिवादींनी प्रतिदावा करुन दुकान गाळयाच्या ताब्याची मागणी केली आहे. दाव्यामध्ये स्थावर मालमत्ता गुंतली असल्यामुळे वादीची कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. कैफियत देण्यास झालेला विलंब नि.क्र. ५५ वर आदेश करुन

माफ करण्यात आला आहे. सबब आदेश.

**<u>आदेश</u>**

वादीने नि.क्र. ५५ वरील आदेशाप्रमाणे रक्कम भरल्यानंतर कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

AMOL ASHOK SHINDE

Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2025.08.19 17:39:26 +0530

**अलिबाग** **(अमोल अ. शिंदे)**

**दिनांकः– १९.०८.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अलिबाग**